**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

---

ग्राहक तक्रार क्र. ३०–०९/ दिनांक :

१) श्री. रामू बाळू पांढरे,
रा. व्हसपेठ (राजोबाची वाडी), ता. जत, जि. सांगली अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. एस.आर.बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे 		दिनांक : ११.०५.२००९

श्री. रामू बाळू पांढरे, रा. व्हसपेठ, ता. जत,जि. सांगली यांचे तक्रार प्रकरण क्र. ३०/०९ यांनी त्यांचे तेथील शेतीपंप कनेक्शनला वीज मीटर बसवून मीटर पध्दतीने बील मिळावे अशी वि.प.कडे मागणी केली आहे. अद्याप मीटर बसविला नाही अशी तक्रार आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांजकडे प्रकरण क्र. ८११ दि. ४.२.२००९ ने क्ष नमुना अर्जात तक्रार दाखल केली होती. त्या बाबत कक्षात सुनावणी होऊन आदेश क्र.२५०० दि. १८.३.२००९ ने कक्षाने निर्णय दिला. त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली नसलेने, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांजकडे दि. १५.४.२००९ रोजी अपील दाख केले आहे. त्यावर मंचाने संबंधिताकडून मुद्देनिहाय अहवाल मागविला व दि. ५.५.२००९ रोजी सांगली येथे सुनावणी ठेवली.

सुनावणीवेळी तक्रारदार किंवा त्यांचे प्रतिनिधी हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. बी.बी. भोसले, कार्यकारी अभियंता, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग इ. हजर होते.

तक्रारदाराची तक्रार

तक्रारदार यांची व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली येथे शेती वीज पंप जोडणी आहे. सदर जोडणीस वीज मीटर बसवून मिळावा व यापुढे वीज बील मीटर प्रमाणे यावे अशी मागणी केली. कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग यांनी तिमाही बिलाचा काळ संपताच दि. १.४.२००९ रोजी वीज मीटर बसविणेत येईल असे आश्वासन दिले. परंतु आजतागायत मीटर बसविलेला नाही. एसओपी प्रमाणे मीटर बसवून, मीटर पध्दतीने बील मिळावे अन्यथा नुकसान भरपाई मिळावी.

वितरण कंपनीचे म्हणणे

तक्रारदार यांचे शेतीपंप वीज जोडणीस मीटर बसविणेचे मागणीवर वि.प.ने सांगितले कि सध्या मार्च क्वार्टरचे बिलींग सुरु असलेने ते संपल्यानंतर दि, १.४.२००९ रोजी मीटर बसविणेत येईल असे म्हटले होते. तथापि, मीटर उपलब्ध नसल्यामुळे ते उपलब्ध झालेवर दि. १७.४.२००९ रोजी सदर जोडणीस मीटर बसविणेत आले व त्यानुसार कार्यवाही झालेचे तक्रारदार यांचे पत्र सादर करणेत आले.

सदस्य सचिव यांचा निष्कर्ष

तक्रारदार यांचे शेतीपंपास वीज मीटर बसवून त्यास मीटर पध्दतीने वीज बील मिळावे हि मागणी आहे. कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी चालू मार्च क्वार्टरचे बिलींग चालू असलेने ते संपलेवर दि. १.४.२००९ रोजी मीटर बसविणेचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात वि.प.कडे मीटर उपलब्ध नसलेने त्यांना आश्वासनाचे पालन करता आले नाही असे दिसते. तदनंतर दि. १७.४.२००९ रोजी वीज जोडणीस मीटर बसविणेत आला व तक्रार निवारण झाले आहे. तक्रारदाराचे एसओपीनुसार कनेक्शनला मीटर बसविणेची कार्यवाही करावी किंवा नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आहे. वि.प.ने कार्यवाही केली असलेने, नुकसान भरपाईचा मुद्दा निकालात निघतो.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, युक्तीवाद, उपलब्ध कागदपत्रे इ. विचारांत घेवून सदस्य सचिव यांजकडून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

## आदेश

१) तक्रारदाराचे अपील फेटाळणेत येत आहे.

२) भरपाईचा आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ११.०५.२००९

( एस. आर. बांबळे )
सदस्य सचिव

श्री. काकासाहेब य. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :